# कोल्हापूर जिल्हातील कनिष्ठ महाविद्यालयात अतांत्रिक शाखेत अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या स्वसंकल्पनेचा अभ्यास

लाड निता नारायणराव
राजाराम कॉलेज, कोल्हापूर

**प्रस्तावना**

शिक्षण हा देशाच्या विकासाचा एक महत्वाचा भाग आहे. तसेच युवक युवती हा त्या राष्ट्राचा कणा मानला जातो. त्याची स्वत:विषयी कल्पना काय आहे यानुसार अभिवृत्ती, क्षमता, प्रेरणा इत्यादी संदर्भातील मूल्यांकन यावर त्यांचा प्रभाव होतो म्हणून विद्यार्थी व त्यांच्या स्वसंकल्पना यांचा प्रभाव त्यांच्या वर्तनावर पडत असतो. यामुळेच वेगवेगळया शाखेत शिकणाऱ्या युवक–युवतींची संकल्पना जाणून घ्यावेसे वाटले.

**स्वसंकल्पनेच्या व्याख्या**

**बायरन**

व्यक्तीच्या स्वतः विषयीच्या कल्पना, भावना, अभिवृत्ती, आवडी निवडी, सवयी , क्षमता, राहणीमान, प्रेरणा, इत्यादींच्या संदर्भात केलेले मूल्यांकन म्हणजे स्वसंकल्पना.

**Coopersmith(1987)**

व्यक्तींच्या स्वत:विषयीच्या संकल्पना आणि अभिवृत्ती यांचे संक्षिप्त रूप म्हणजे स्वसंकल्पना होय.

**संशोधनाची पार्श्वभूमी**

विद्यार्थी विकासामध्ये योगदान देणारा महत्वाचा घटक म्हणजे संकल्पना. स्वतः विषयीची संकल्पना ही किशोराव्यवस्थेत मध्ये महत्वाची भूमिका बजावते. कला, वाणिज्य व शास्त्र शाखेतील मुला–मुलींची स्वसंकल्पना आणि शाखा निवड यांचा संबंध जाणून घेण्यासाठी प्रस्तुत संशोधन हाती घेतले.

यांनी हॉगकॉग मधील उच्च माध्यकिमध्ये कला व सायन्स शाखेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या स्व–संकल्पनेचा अभ्यास केला. कुपर स्मिथ स्व आदार शोधिका व मिशिगन स्व – संकल्पना क्षमता मापनी वापरण्यात आली. स्टॅटीफाईट रॅन्डम सॅम्लल पध्दतीच्या साहय्याने 480 विद्यार्थी निवडण्यात आले. यामध्ये त्यांना विद्यार्थ्यांच्या स्व–संकल्पनेत धनात्मक संबंध दिसून आला.

Mohammed Al- Zyoudi(2007) यांनी कमीदृष्टी असणाऱ्या किशोरांच्या स्व संकल्पनेवर लिंगभेदाचा परिणाम काय होते याचा अभ्यास केला. यासाठी 23 किशोर निवडलेपैकी 10 पुरूष व 13 स्त्रिया घेण्यात आल्या. 12 ते 17 वयोगटातील इयत्ता 11 वी च्या वर्गातील विद्यार्थी निवडले. यासाठी त्यांनी Tennessee स्व–संकल्पना मापनीचा वापर केला. लिंगभेदाचा परिणाम वर्तनावर व स्व–संकल्पनेवर झाल्याचे दिसून आले.

Crai C. (1997) यांना कमी दृष्टी असणाऱ्या किशोरांची स्व–संकल्पना कमी असल्याचे दिसून आले.

Harter S. , Bresnick, Bouchey H. A. and Whitesell N.R.(1997)यांना किशोरांच्या बुहविध भूमिका विकासामध्ये मुलींना स्थिर स्वसंकल्पना तयार होण्यात अडचणी येतात असे दिसून आले.

Rosenblem L.(2000) यांनी किशोरांच्या दृष्टीदोषामुळे संवेदनावरील परिणामाचा अभ्यास केला. त्यांना दृष्टीदोष असणाऱ्या किशोरांची स्व–संकल्पना कमी असल्याचे दिसून आले.

**संशोधनाची उद्दिष्टे**

1) कनिष्ट महाविद्यालयात कला शाखेतील अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या व विद्यार्थीनींच्या संकल्पनेचा अभ्यास करणे.

2) कनिष्ठ महाविद्यालयात वाणिज्य शाखेत अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या व विद्यार्थीनिंच्या स्व–संकल्पनेचा अभ्यास करणे.

3) कनिष्ठ महाविद्यालयात शास्त्र शाखेत अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या व विद्यार्थीनींच्या संकल्पनेचा अभ्यास करणे.

**गृहीतकें**

1) कनिष्ठ महाविद्यालयात कला शाखेत अध्ययन करणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थीनींच्या स्व–संकल्पनेत फरक नसतो.

2) कनिष्ठ महाविद्यालयात वाणिज्य शाखेत अध्ययन करणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थीनींच्या स्व–संकल्पना चांगली असते.

3) कनिष्ठ महाविद्यालयात शास्त्र शाखेत अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यापेक्षा विद्यार्थीनींची स्व–संकल्पना चांगली असते.

**नमुना निवड**

कोल्हापूर जिल्हातील कनिष्ठ महाविद्यालयात कला, वाणिज्य व शास्त्र शाखेत अध्ययन करणाऱ्या फक्त 240 विद्यार्थ्यांची निवड केली.



**मापन साधन**

आर.के. सारस्वत यांची स्व–संकल्पना चाचणी वापरण्यात आली. यामध्ये 48 विधाने आहेत. प्रस्तुत चाचणीची विश्वसनियता 0.91 इतकी आहे.

**संख्या शास्त्र**

कनिष्ठ महाविद्यालयातील कला शाखा, वाणिज्य शाखा व शास्त्र शाखेत अध्ययन करणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थीनीचे मध्यमान प्रमाण विचलन व मध्यमान फरकाचे 't' मूल्य

**संशोधनाची फलिते**

**तक्ता क्र.1**

**कला शाखेतील विद्यार्थी व विद्यार्थीनींचे मध्यमान, प्रमाणविचलन, टी मूल्य दर्शविणारा तक्ता**

| विद्यार्थी | संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | टी मूल्य | सार्थकता |
|---|---|---|---|---|---|
| मुले | **40** | **181** | **15.1** | **1.81** | **0.05 पातळीवर लक्षणीय भेद दिसून येत नाही.** |
| मुली | **40** | **175.35** | **11.7** | | |

**तक्ता क्र.2**

**वाणिज्य शाखेतील विद्यार्थी व विद्यार्थीनींचे मध्यमान, प्रमाणविचलन, टी मूल्य दर्शविणारा तक्ता**

| विद्यार्थी | संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | टी मूल्य | सार्थकता |
|---|---|---|---|---|---|
| मुले | **40** | **178.75** | **13.9** | **0.68** | **0.05 पातळीवर लक्षणीय भेद दिसून येत नाही.** |
| मुली | **40** | **180.62** | **10.4** | | |

**तक्ता क्र.3**

**शास्त्र शाखेतील विद्यार्थी व विद्यार्थीनींचे मध्यमान, प्रमाणविचलन, टी मूल्य दर्शविणारा तक्ता**

| विद्यार्थी | संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | टी मूल्य | सार्थकता |
|---|---|---|---|---|---|
| मुले | **40** | **177.5** | **14.87** | **1.93** | **0.05 पातळीवर लक्षणीय भेद दिसून येत नाही.** |
| मुली | **40** | **171.12** | **14.62** | | |

**चर्चा**

तक्ता क्र.1 मध्ये कला शाखेतील विद्यार्थ्यांच्या स्व–संकल्पनेचे मध्यमान 181 प्रमाण विचलन 15.9 इतके आले. विद्यार्थीनींच्या स्व–संकल्पनेचे मध्यमान 175.35 व प्रमाण विचलन 11.7 इतके आहे. या दोन्हीचे टी मूल्य 1.81 इतके झाले. हे मूल्य 0.05 पातळीवर लक्षणीय भेद दर्शवित नाही म्हणजेच कला शाखेतील मुले व मुली यांच्या स्व–संकल्पनेमध्ये लक्षणीय फरक नाही. दोन्ही गटातील विद्यार्थ्यांची स्वं–संकल्पना सारखीच असल्याचे दिसून आले. कनिष्ठ महाविद्यालयात कला शाखेत अध्ययन करणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थींनीच्या स्व–संकल्पनेत फरक नसतो.

तक्ता क्र.2 मध्ये वाणिज्य शाखेत अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्व–संकल्पनेचे मध्यमान 178.75 व प्रमाण विचलन 13.9 इतके आले. विद्यार्थीनींच्या स्व–संकल्पनेचे मध्यमान 180.62 व प्रमाण विचलन 10.4 इतके आले. या दोन्हीचे टी मूल्य 0.68 इतके झाले. हे मूल्य 0. 05 पातळीवर लक्षणीय भेद दर्शवित नाही म्हणजेच वाणिज्य शाखेतील मुले व मुली यांच्या स्व–संकल्पनेमध्ये लक्षणीय फरक नाही. कनिष्ठ महाविद्यालयात वाणिज्य शाखेत अध्ययन करणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थीनीच्या स्व–संकल्पना सारखीच असते.

तक्ता क्र3मध्ये शास्त्र शाखेत अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे मध्यमान 177.50 व प्रमाण विचलन 14.87 इतके आहे. त्याचबरोबर विद्यार्थीनींचे मध्यमान 171.12 व प्रमाण विचलन 14.62 इतके आहे. या दोन्हीचे टी मूल्य 193 इतके झाले. हे मूल्य 0.09 पातळीवर लक्षणीय भेद दर्शवित नाही म्हणजेच शास्त्र शाखेतील मुले व मुली यांच्या स्व–संकल्पना सारखीच असल्याचे दिसून आले. कनिष्ठ महाविद्यालयात शास्त्र शाखेत अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांपेक्षा विद्यार्थीनीची संकल्पना चांगली असते हे गृहित स्विकारत नाही.

**निष्कर्षः**

1) कला शाखेत कनिष्ठ महाविद्यालयात अध्ययन करणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या स्व–संकल्पनेत फरक नसतो.

2) वाणिज्य शाखेत कनिष्ठ महाविद्यालयात अध्ययन करणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या स्व–संकल्पना सारखीच असते.

3) शास्त्र शाखेत कनिष्ठ महाविद्यालयात अध्ययन करणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या स्व–संकल्पनेत फरक नसतो.

**मर्यादाः**

1) प्रदत्त कोल्हापूर जिल्हयातील असल्याने तो मर्यादित होता. मर्यादित स्वरूपाच्या प्रदत्तावरून काढलेल्या निष्कर्षाचे सामान्यीकरण करणे योग्य नाही.

2) प्रदत्त अतांत्रिक विद्या शाखेपुरता मर्यादित आहे.

3) संशोधनामध्ये वय, जात, धर्म, जिल्हा, देश या परिवर्तकांचा परिणाम अभ्यासला नाही.

**शिफारशी**

1) प्रदत्त कोल्हापूर शिवाय इतर शहरातील निवडून संशोधन करता येईल.

2) जास्तीत जास्त प्रदत्त गोळा करून निष्कर्ष मांडणे.

3) संशोधनामध्ये वय, जात, धर्म, जिल्हा, देश या परिवर्तकाचा विचार करणे.

4) तांत्रिक विद्याशाखेतील प्रस्त होऊन संशोधन करता येईल.

**संदर्भ ग्रंथ**

- Crain (1997) The influence of age, race and gender on child and adolescent self- concept in Bracken B.A. Editor.Handbook of self-concept 395-420.
- Garrett H. E. (2006) Statistics in Psychology and education, Sarjeet Publication, Delhi.
- Harter S. Bresnick S, Bouchey H A and White sell N R (1997) . The development of multiple role- related selves during aclolescences.Dev Psychopath 4. 835-853.
- LAU Sing, William, J.F.LEW(1980) .The Self concept of Art and Science students in Hong Kong Secondary Schools, Education Journal Vol. 8. 23-37
- Mohammed Al- Zyoudi(2007) Gender differences in self concept among adolescents with low vision, international Journal of special education volume 22 No. 1132-136
- Polemblem L. (2000) Perceptions of the impact of visual impairment on the leves of adolescens, journal of visual, impairment and Blindness 94,434 -445